शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), अधिनियम, २०१५

"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

ई-मेल : fra.govmh@gmail.com
संकेतस्थळ : www.mahafra.org
संपर्क : ०२२-३१९८०३४८ / ८८२८७ ८६२६४

शुल्क नियामक प्राधिकरणाच्या ५४ व्या बैठकीचे इतिवृत्त

दिनांक :२३ ऑक्टोबर, २०२६

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश आणि शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम ११(२)(३)(४) या मजकुराऐवजी सुधारणा अधिनियम, २०२६ अंतर्गत स्थापन केलेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाची ५४ व्या बैठक श्री. शेखर माधूरी मनोहर चन्ने, भा.प्र.से, (से.नि),अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३ ऑक्टोबर, २०२६ रोजी बैठक रुम क्र.३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे संपन्न झाली.

खालील सदस्य उपस्थित/अनुपस्थित होते :

१	मा.श्री. शेखर माधूरी मनोहर चन्ने, भा.प्र.से, सेवानिवृत्त सचिव, अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण	उपस्थित
२	डॉ. मुरलीधर मुक्ताबाई गोविंदराव चांदेकर, माजी कुलगुरु, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण	विडिओ कॉन्फरन्सिंगव्दारे उपस्थित
३	श्री.नितीन बापुराव चव्हाण सनदी लेखापाल सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण	उपस्थित
४	श्री. श्रीकांत निर्मल मोहन लिमये सनदी लेखापाल सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण	उपस्थित
५	श्री.अतुल दामोदर धारप परिव्यय लेखापाल, सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण	उपस्थित
६	श्री. अश्विन मधुसूदन सोलंकी परिव्यय लेखापाल, सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण	उपस्थित
७	डॉ. दत्तात्रय वेनुबाई व्यंकटराव जाधव, व्यावसायिक शिक्षण तज्ज्ञ सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण	विडिओ कॉन्फरन्सिंगव्दारे उपस्थित
८	संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण	अनुपस्थित

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

९	संचालक, उच्च शिक्षण (म.रा.) पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण प्रतिनिधी डॉ. संजीव अर्जुनराव सोनावणे, शैक्षणिक प्रशासक आणि शिक्षणतज्ज्ञ उच्च शिक्षण, पुणे.	उपस्थित
१०	आयुक्त वैद्यकीय शिक्षण (म.रा.) पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण	अनुपस्थित
११	संचालक, आयुष (म.रा.) पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण प्रतिनिधी डॉ. संदीप काळे, सहाय्यक प्राध्यापक, आर.ए.पी.एम.सी., मुंबई.	विडिओ कॉन्फरन्सिंगव्दारे उपस्थित
१२	महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेचे सदस्य सचिव, पुणे आणि पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण.	अनुपस्थित
१३	श्री समीर कुर्तकोटी, भा.प्र.से. सदस्य सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण	उपस्थित

विषय क्र.१: <u>शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी शुल्क निश्चित करण्याच्या निर्णयाविरुद्ध महाविद्यालये/संस्थांनी दाखल केलेल्या पुनर्विलोकन अर्जांचा (Review Application) विचार करणे.</u>

i) विश्वकर्मा कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, पुणे (BBA16300) यांनी B.B.A/B.C.A अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. ९९/२०२६.**

"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. डॉ. अरुण आर. पाटील, संस्थेचे प्राचार्य
२. डॉ. अंजुम ए. पटेल, संस्थेचे विभाग प्रमुख
३. श्री. संतोष ए. कारेकर, संस्थेचे लेखा अधिकारी

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

संस्थेच्या बी.सी.ए. (BCA) अभ्यासक्रमाच्या संदर्भात प्राधिकरणाने असे निदर्शनास आणून दिले की, गणना पत्रिकेची तपासणी केली असता खर्चात १२० ऐवजी ३६० ग्राह्य धरण्यात आले असून, नियमानुसार जी वाढ देण्यात येते ती विचारात घेण्यात आली आहे. त्यानुसार सदर अभ्यासक्रमाची शुल्क ₹५३,५००/- निश्चित करण्यात आली आहे.

तसेच, बी.बी.ए. (BBA) अभ्यासक्रमाच्या संदर्भात, कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगानुसार (7th Pay) सुविधा देण्याबाबतचे नियुक्ती आदेश (Appointment Order) सादर न केल्यामुळे हा खर्च अमान्य (Disallowed) करण्यात आला आहे. संस्थेने नमूद केलेल्या सर्व मुद्द्यांची सविस्तर तपासणी करण्यात आली; परंतु यापैकी कोणताही मुद्दा योग्य किंवा समाधानकारक वाटत नसल्याने, बी.बी.ए. (BBA) अभ्यासक्रमाच्या बाबतीत सादर केलेला पुनर्विलोकन अर्ज (Review Application) फेटाळण्यात (Rejected) येत आहे.

वरील बाबींचा विचार करता, सदर पुनर्विलोकन अर्जावरील निर्णय खालीलप्रमाणे आहे:

Review Application No.	Name of the Institute	Course	After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027 Per Student (Rs.)
९९/२०२६	विश्वकर्मा कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, पुणे. **Code No: BBA16300**	**B.B.A**	**Rejected**
		B.C.A	**53,500/-**

ii) ग्रामोन्नती मंडळ संचलित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे (BBA16172) यांनी B.B.A अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. १३४/२०२६.**
"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. श्री. एस. ए. कुलकर्णी, संस्थेचे कार्यालयीन अधीक्षक
२. श्री. वाबळे एन. डी., संस्थेचे लेखापाल
३. श्री. समीर भिडे, संस्थेचे सनदी लेखापाल

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

संस्थेच्या वतीने असे निवेदन करण्यात आले की, प्रवेश क्षमता ३०० गृहीत धरून खर्चाचा भाग विभागण्यात आला होता. मात्र, त्यापूर्वी प्रत्यक्ष खर्च क्षमता १८० ठेवण्यात आल्याने, २ वर्षांचे मिळून ३६० (शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील ३०० जागांसह एकूण ६६०) असे गृहीत धरण्यात आले होते.

संस्थेचे हे म्हणणे वस्तुस्थितीवर आधारित असल्याचे दिसून आल्याने ते प्रत्यक्ष विचारात घेण्यात आले आहे. यापूर्वी प्रत्यक्ष घेतलेले शुल्क ही इतर चुकीमुळे खर्चात धरले गेले असल्याने ते नियमानुसार खर्चातून वगळण्यात आले होते. ही दुरुस्ती वाजवी निकषांवर आधारित असल्याने व संस्थेच्या पुनर्तपासणीच्या मागणीचा आधार ग्राह्य धरून, **पुनर्विलोकन अर्ज (Review Application) मान्य** करण्यात येत असून, शुल्क **खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत** आहे:-

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

Review Application No.	Name of the Institute	Course	After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027 Per Student (Rs.)
१३४/२०२६	ग्रामोन्नती मंडळ संचलित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे. **Code No. BBA16172**	**B.B.A**	**36,000/-**

iii) वाणिज्य, व्यवस्थापन आणि संगणक विज्ञान महाविद्यालय, नाशिक (BBA05619) यांनी B.B.A अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. १३६/२०२६.**

"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. डॉ. मधुकर नथू शेलार, संस्थेचे प्राचार्य,
२. श्री. राजाराम बास्ट, संस्थेचे सनदी लेखापाल,
३. श्री. रवींद्र देशमुख, संस्थेचे सनदी लेखापाल,
४. श्री. अनिकेत आबांराव कारे, संस्थेचे लेखापाल,

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

संस्थेच्या वतीने सादर करण्यात आलेल्या निवेदनानुसार, सदर अभ्यासक्रमाचा कालावधी ३ वर्षांचा असल्याने त्यानुसार विद्यार्थ्यांची एकूण प्रवेश क्षमता ९०० निश्चित करणे अपेक्षित होते. तथापि, प्रत्यक्षात १२०० विद्यार्थी संख्या ग्राह्य धरण्यात आलेली असल्याचे संस्थेने निदर्शनास आणून दिले आहे.

संस्थेने सादर केलेले निवेदन व त्यातील सर्व मुद्दे विचारात घेता, सदर प्रकरणाचा वस्तुस्थितीच्या आधारे पुनर्विचार करून संस्थेच्या **पुनर्विलोकन अर्ज (Review Application) मान्य** करण्यात येत असून, शुल्क **खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत** आहे:-

Review Application No.	Name of the Institute	Course	After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027 Per Student (Rs.)
१३६/२०२६	वाणिज्य, व्यवस्थापन आणि संगणक विज्ञान महाविद्यालय, नाशिक Code No. BBA05619	**BBA**	**37,500/-**

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

iv) KAANM, सोनावणे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सटाणा, तालुका - बागलाण, जिल्हा - नाशिक, (BBA05622) यांनी B.B.A अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. १३९/२०२६.**

"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. श्री. अनिल निंबा पाटील – संस्थेचे प्राचार्य.
२. श्री. राजाराम शिवाजी बस्त – संस्थेचे सनदी लेखापाल .
३. श्री. रविंद्र देशमुख – संस्थेचे सनदी लेखापाल.
४. श्री. ए. अनिल भावसार – संस्थेचे लेखापाल, संस्थेचे.

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

संस्थेच्या वेतनासाठी रुपये ८,४८,६३२/- इतकी रक्कम अमान्य करण्यात आली होती. तथापि, संस्थेने सादर केलेली विनंती विचारात घेऊन ती मान्य करण्यात आली व त्यानुसार **पुनर्विलोकन अर्ज (Review Application) मान्य** करण्यात येत असून, शुल्क **खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत** आहे:-

Review Application No.	**Name of the Institute**	**Course**	**After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027 Per Student (Rs.)**
१३९/२०२६	KAANM,सोनावणे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सटाणा, तालुका – बागलाण, जिल्हा – नाशिक **Code No. BBA05622**	**BBA**	**37,500/-**

v) के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान आणि संगणक विज्ञान महाविद्यालय, नाशिक(BBA05650) यांनी B.B.A /B.C.A अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. १४१/२०२६.**
"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. श्री. समीर बी. वाघ – संस्थेचे अध्यक्ष.
२. प्रा. के. एस. बांदी – संस्थेचे सचिव
३. श्री. समीर भिडे – संस्थेचे सनदी लेखापाल .
४. डॉ. पी. व्ही. रासळ – संस्थेचे प्राचार्य

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

बी.बी.ए. (BBA) अभ्यासक्रमाच्या संदर्भात संस्थेच्या वतीने निवेदन करण्यात आले की, विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता (Student Intake) एकूण २५% पर्यंत मर्यादित करण्यात आलेली आहे. तथापि, प्रत्यक्षात सद्यस्थितीत NAAC च्या निकषांनुसार शिक्षकांची नियुक्ती व शैक्षणिक व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच, संस्थेने केलेल्या विनंतीनुसार २० विद्यार्थ्यांमागे १ शिक्षक या प्रमाणात शिक्षकांची मान्यता देण्याबाबत निर्देश देण्यात आले व पुनर्विलोकन अर्ज (Review Application) मान्य करण्यात आला.

संस्थेच्या बी.सी.ए. (BCA) अभ्यासक्रमाच्या संदर्भात संस्थेच्या वतीने निवेदन करण्यात आले की, विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता (Student Intake) एकूण २५% पर्यंत मर्यादित करण्यात आलेली आहे. तथापि, प्रत्यक्षात सद्यस्थितीत NAAC च्या निकषांनुसार शिक्षकांची नियुक्ती व शैक्षणिक व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच, संस्थेने केलेल्या विनंतीनुसार २५ विद्यार्थ्यांमागे १ शिक्षक या प्रमाणात शिक्षकांची मान्यता देण्याबाबत निर्देश देण्यात आले व त्यानुसार **पुनर्विलोकन अर्ज (Review Application) मान्य** करण्यात येत असून, शुल्क **खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत** आहे:-

Review Application No.	Name of the Institute	Course	After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027 Per Student (Rs.)
१४१/२०२६	के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान आणि संगणक विज्ञान महाविद्यालय, नाशिक **Code No. BBA05650**	**B.B.A**	**44,500/-**
		B.C.A	**45,500/-**

vi) कांदिवली एज्युकेशन सोसायटी संचलित, बी. के. श्रॉफ कॉलेज ऑफ आर्ट्स आणि एम. एच. श्रॉफ कॉलेज ऑफ कॉमर्स, मुंबई (BBA03651) यांनी B.B.A/B.C.A/BMS अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. १४६/२०२६.**

"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. डॉ. व्ही. एस. कन्नन – संस्थेचे प्रशासकीय अधिकारी,
२. कु. सानिका बांदेकर – संस्थेचे वरिष्ठ लिपिक,
३. कु. अश्विनी विचारे – संस्थेचे लेखापाल,
४. श्री. रोहित विश्वकर्मा – संस्थेचे सनदी लेखापाल.

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

बी.बी.ए. (BBA) अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने संस्थेच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाची रक्कम विचारात घेण्यात आलेली नाही, असे निवेदन संस्थेच्या वतीने करण्यात आले. सदर निवेदनाची प्राधिकरणामार्फत तपासणी केली असता, संस्थेने मांडलेली बाब वस्तुस्थितीवर आधारित असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे बी.बी.ए. अभ्यासक्रमासाठी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन विचारात घेऊन पुनर्विलोकन अर्ज (Review Application) मान्य करण्यात आला.

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

बी.सी.ए. (BCA) अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने शिक्षकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनाची पूर्ण रक्कम विचारात घेण्यात आलेली नाही, असे संस्थेच्या वतीने निवेदन करण्यात आले. सदर बाब विचारात घेऊन, तीन वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेल्या शिक्षकांची एकूण संख्या निश्चित करून, त्यानुसार शिक्षकांचे वेतन विचारात घेण्यात आले, सदर मुद्दा योग्य व वस्तुस्थितीवर आधारित असल्याने,त्यानुसार पुनर्विलोकन अर्जामध्ये (Review Application) आवश्यक ती सुधारणा करण्यात आली व अर्ज (Review Application) मान्य करण्यात आला.

बी.एम.एस. (BMS) अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने संस्थेच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाची रक्कम विचारात घेण्यात आलेली नाही, असे निवेदन संस्थेच्या वतीने करण्यात आले. सदर निवेदनाची प्राधिकरणामार्फत तपासणी केली असता, संस्थेने मांडलेली बाब वस्तुस्थितीवर आधारित असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे बी.बी.ए. अभ्यासक्रमासाठी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन विचारात घेऊन व त्यानुसार **पुनर्विलोकन अर्ज (Review Application) मान्य** करण्यात येत असून, BBA/BCA/BMS अभ्यासक्रमाच्या शुल्क **खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत** आहे:-

Review Application No.	Name of the Institute	Course	After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027 Per Student (Rs.)
१४६/२०२६	कांदिवली एज्युकेशन सोसायटी संचलित, बी. के. श्रॉफ कॉलेज ऑफ आर्ट्स आणि एम. एच. श्रॉफ कॉलेज ऑफ कॉमर्स, मुंबई Code No. BBA03651	B.B.A	64,500/-
		B.C.A	65,500/-
		B.M.S	49,500/-

vii) अशोका सेंटर फॉर बिझनेस अँड कॉम्प्युटर स्टडीज, नाशिक(BBA05601) यांनी B.B.A अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. १४८/२०२६.**
"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. डॉ. हर्षा के. पाटील – संस्थेचे प्रभारी प्राचार्य
२. श्री. शिंपी शशिकांत गोपाळराव – संस्थेचे उपकुलसचिव
३. श्रीमती. स्वप्नजा प्रभुणे – संस्थेचे वरिष्ठ व्यवस्थापक
४. श्री. सचिन जाळणेकर – संस्थेचे लेखा अधिकारी

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

संस्थेच्या वतीने युक्तिवाद करण्यात आला की, कॉम्प्युटेशन शीटमध्ये (Computation Sheet) काही खर्चाच्या बाबी अमान्य करण्यात आलेल्या असून, सदर खर्चाच्या बाबी मान्य करण्यात याव्यात, अशी विनंती करण्यात आली.

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

संस्थेची सदर विनंती विचारात घेतली असता, तीन वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेल्या शिक्षकांच्या वेतनाची गणना कमी प्रमाणात करण्यात आल्याचे निदर्शनास आले. ही बाब विचारात घेऊन शिक्षकांच्या वेतनाच्या रकमेमध्ये रुपये १८,१७,२३२/- इतकी वाढ करण्यात आली. तथापि, प्रत्यक्ष गणनेनुसार रुपये १,११,२१,१३८/- इतकी रक्कम **मान्य** करण्याबाबत विचार करण्यात आला.

तसेच, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या बाबतीत रु. १५,१२,०००/- इतकी वाढ विचारात घेऊन सदर रक्कम रु. १९,७६,६५९/- इतकी निश्चित करण्यात आली. त्यानंतर सर्व बाबींची संपूर्ण पडताळणी व पुनर्गणना केल्यानंतर संस्थेने केलेले निवेदन विचारात घेऊन **पुनर्विलोकन अर्ज (Review Application) मान्य** करण्यात येत असून, शुल्क **खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत** आहे:-

Review Application No.	Name of the Institute	Course	After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027 Per Student (Rs.)
१४८/२०२६	अशोका सेंटर फॉर बिझनेस अँड कॉम्प्युटर स्टडीज, नाशिक **Code No. BBA05601**	**BBA**	**48,000/-**

viii) पी. जोग कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स नाशिक, (BBA16208) यांनी B.B.A/B.C.A अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. १५०/२०२६.**

"श्रीमती पूनम माने, लेखा विभाग प्रमुख, संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होते.

म्हणणे ऐकून घेतले.

सुनावणीदरम्यान संस्थेच्या प्रतिनिधींना आवश्यक त्या समर्थनार्थ कागदपत्रांसह (Supporting Documents) एक्सेल शीटमध्ये माहिती तयार करून ती ८ दिवसांच्या आत सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले. सदर कागदपत्रे व माहिती प्राप्त होईपर्यंत पुनर्विलोकन अर्जाची (Review Application) सुनावणी **पुढील तारखेपर्यंत स्थगित (Adjourned)** करण्यात येत आहे.

सुनावणीची **पुनर्विलोकन अर्ज पुढील तारीख योग्य वेळी कळविण्यात येईल**".

ix) इंद्रायणी महाविद्यालय पुणे (BBA16173) यांनी B.B.A /BCA अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. १५९/२०२६.**

"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. श्री. संभाजी माईंघे – संस्थेचे, प्राचार्य,
२. श्री. मोहन मल्होत्रा – संस्थेचे , सनदी लेखापाल .
३. श्रीमती विद्या भेगडे – संस्थेचे , संचालिका, मॅनेजमेंट कॉलेज.
४. श्रीमती गायत्री हिंगे – संस्थेचे, लेखापाल.
५. श्रीमती मोनाली चासकर – संस्थेचे ,लेखापाल.

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

संस्थेच्या वतीने निवेदन करण्यात आले की, संस्थेने अनेक खर्चाच्या बाबींची देयके ट्रस्टच्या खात्यामधून अदा केलेली असल्यामुळे सदर खर्च महाविद्यालयाच्या लेखा खात्यामध्ये दर्शविण्यात आलेले नाहीत. तथापि, प्रत्यक्षात सदर खर्च महाविद्यालयाच्या कामकाजासाठी व महाविद्यालयाच्या अनुषंगाने करण्यात आलेले आहेत.

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

संस्थेने केलेली सदर विनंती विचारात घेऊन, ट्रस्टच्या खात्यामधून कोणत्या खर्चाच्या बाबींवर खर्च करण्यात आलेला आहे, याची बाबनिहाय सविस्तर माहिती तसेच इतर खर्चाच्या बाबींसंदर्भातील आवश्यक खुलासा व समर्थनार्थ कागदपत्रे ८ दिवसांच्या आत प्राधिकरणाच्या कार्यालयात सादर करण्याबाबत संस्थेस निर्देश देण्यात आले.

सदर माहिती व कागदपत्रे प्राप्त होईपर्यंत पुनर्विलोकन अर्जाची (Review Application) सुनावणी **पुढील तारखेपर्यंत स्थगित (Adjourned)** करण्यात येत आहे.

सुनावणीची **पुनर्विलोकन अर्ज पुढील तारीख योग्य वेळी कळविण्यात येईल**

x) के. पी. बी. हिंदुजा कॉलेज ऑफ कॉमर्स (BBA03703) यांनी B.B.A /BMS अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. १६१/२०२६.**

"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. श्री. संभाजी माईघे – संस्थेचे, प्राचार्य,
२. श्री. मोहन मल्होत्रा – संस्थेचे , सनदी लेखापाल .
३. श्रीमती विद्या भेगडे – संस्थेचे , संचालिका, मॅनेजमेंट कॉलेज.
४. श्रीमती गायत्री हिंगे – संस्थेचे, लेखापाल.
५. श्रीमती मोनाली चासकर – संस्थेचे ,लेखापाल.

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

सुनावणीदरम्यान असे निदर्शनास आले की बी.बी.ए. (BBA) अभ्यासक्रमाची प्रत्यक्ष विद्यार्थी प्रवेश क्षमता (Intake) (१२० + २४० + २४० =६००),त्यामुळे सदर अभ्यासक्रमाची प्रत्यक्ष प्रवेश क्षमता ६०० विद्यार्थी असल्याचे स्पष्ट झाले. तसेच, व्हिजिटिंग फॅकल्टी (Visiting Faculty) यांचे वेतन मान्य करता येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. संस्थेने रुपये १,६०,७६८/- इतक्या रकमेची मागणी केली होती. तथापि, प्राधिकरणाने तपासणीअंती रुपये १,१८,०००/- इतकी रक्कम मंजूर करण्याचा निर्णय घेतला.

बी.एम.एस. (BMS) अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने, संस्थेने सुनावणीदरम्यान मांडलेली बाब वस्तुस्थितीवर आधारित असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संस्थेने सादर केलेल्या पुनर्विलोकन अर्जाचा विचार करून, उपलब्ध अभिलेख व वस्तुस्थितीच्या आधारे पुनर्विलोकन अर्जामध्ये आवश्यक ती सुधारणा करण्यात येत आहे.

त्यानुसार **पुनर्विलोकन अर्ज (Review Application) मान्य** करण्यात येत असून, BBA/BMS अभ्यासक्रमाच्या शुल्क **खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत** आहे:-

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

Review Application No.	Name of the Institute	Course	After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027 Per Student (Rs.)
१६१/२०२६	के. पी. बी. हिंदुजा कॉलेज ऑफ कॉमर्स Code No. BBA03703	**B.B.A**	**1,18,000/-**
		B.M.S	**52,500/-**

xi) महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, समाजश्री प्रशांतदादा हिरे कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी नाशिक (HM5219) यांनी HM अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. ६९/२०२६.**

"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. श्री. नितीन आर. जाधव – संस्थेचे, प्राध्यापक.
२. श्री. पठाडे धर्मीराज पी. – संस्थेचे, कार्यालय अधीक्षक.

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

संस्थेच्या वतीने युक्तिवाद करण्यात आला की, संस्थेच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वय यापूर्वी २३ वर्षे गृहीत धरून त्यांच्यावरील रुपये २,४३,३८७/- इतका खर्च मान्य करण्यात आला होता. तथापि, संस्थेने सदर कर्मचाऱ्यांचे प्रत्यक्ष वय ४६ वर्षे असल्याचे निदर्शनास आणून दिले. संस्थेने सादर केलेली बाब विचारात घेऊन सदर कर्मचाऱ्यांचे वय ४६ वर्षे गृहीत धरण्यात आले.

सुनावणीदरम्यान संस्थेने केलेली विनंती विचारात घेऊन, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच स्वच्छता व साफसफाई सेवेसाठी (Cleaning & Sweeping Services) यापूर्वी अमान्य करण्यात आलेला खर्च तपासणीअंती मान्य करण्यात आला. सदर **पुनर्विलोकन अर्ज (Review Application) मान्य** करण्यात येत असून, शुल्क **खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत** आहे:-

अध्यक्ष
विधायक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

Review Application No.	Name of the Institute	Course	After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027 Per Student (Rs.)
६९/२०२६	महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, समाजश्री प्रशांतदादा हिरे कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी नाशिक. **Code No: HM5219**	**B.HMCT**	**1,22,000/-**

xii) SMBT इन्स्टिट्यूट ऑफ डेंटल सायन्सेस अँड रिसर्च, इगतपुरी, नाशिक (BDS0027) यांनी B.D.S अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र.** २१२/२०२६.

"चर्चा करण्यात आली.

कोणीही उपस्थित नव्हते.

संस्थेने ई-मेलद्वारे पत्र पाठवून पुनर्विलोकन अर्जाच्या सुनावणीस स्थगिती देण्याची विनंती केली आहे.

सदर स्थगितीची विनंती मंजूर करण्यात येत आहे. पुनर्विलोकन अर्जाची (Review Application) सुनावणी **पुढील तारखेपर्यंत स्थगित (Adjourned)** करण्यात येत आहे.

सुनावणीची **पुनर्विलोकन अर्ज पुढील तारीख योग्य वेळी कळविण्यात येईल**".

xiii) महात्मा गांधी मिशन (MGM) डेंटल कॉलेज आणि हॉस्पिटल, नवी मुंबई(BDS0013) यांनी B.D.S अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र.** २२८/२०२६.
"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. डॉ. श्रीवल्ली नटराजन – संस्थेचे अधिष्ठाता (डीन),
२. श्री. सौरभ अग्रवाल – संस्थेचे लेखापरीक्षक ,
३. श्री. तेजस डी. मोडक – संस्थेचे लेखापाल,

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

सुनावणीअंती संस्थेच्या प्राचार्यांनी दिनांक २३/१०/२०२६ रोजी पत्र सादर करून पुनर्विलोकन अर्ज (Review Application) मागे घेण्याची विनंती केली.

संस्थेची सदर विनंती मान्य करण्यात येत असून, संस्थेने पुनर्विलोकन अर्ज मागे घेतल्यामुळे सदर अर्ज मागे घेतल्याच्या कारणास्तव निकाली काढण्यात येत आहे **(Disposed of as Withdrawn)**".

xiv) VYWS डेंटल कॉलेज आणि हॉस्पिटलअमरावती(BDS0009) यांनी B.D.S/B.D.S.P.G अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र.** २२९/२०२६.
"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. डॉ. राजेश वसंत गोंधळकर – संस्थेचे अधिष्ठाता,
२. डॉ. हरीश आर. गुल्हाणे – संस्थेचे प्रशासकीय अधिकारी,
३. श्री. चैतन्य इंगळे – संस्थेचे सनदी लेखापाल

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

बी.डी.एस. (B.D.S) अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने संस्थेच्या वतीने निवेदन करण्यात आले की, रुग्णालयाच्या तुटीवरील (Hospital Deficit) रक्कम कमी दर्शविण्यात आली होती. तसेच, संस्थेने सदर बाबीमध्ये वर्षनिहाय खर्च कमी दर्शविला असल्याने रुग्णालयाच्या तुटीवरील संपूर्ण खर्च विचारात घेण्यात आलेला नव्हता. सदर त्रुटी संस्थेने निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्यात आली. त्यानुसार रुग्णालयाच्या तुटीवरील रक्कम विचारात घेऊन **पुनर्विलोकन अर्ज (Review Application) मान्य** करण्यात आला.

तसेच , बी.डी.एस. पी.जी. (BDS PG) अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने सुनावणीदरम्यान उपलब्ध कागदपत्रे व संस्थेने सादर केलेले निवेदन विचारात घेण्यात आले. तथापि, संस्थेने सादर केलेल्या बाबींच्या आधारे पुनर्विलोकन अर्ज मान्य करता येत नसल्याने बी.डी.एस. पी.जी. अभ्यासक्रमासंदर्भातील पुनर्विलोकन अर्ज **नामंजूर (Rejected)** करण्यात आला.

त्यानुसार, सदर **पुनर्विलोकन अर्ज (Review Application)** अर्जाबाबतचा आदेश खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे:-

Review Application No.	Name of the Institute	Course	After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027 Per Student (Rs.)
२२९/२०२६	VYWS डेंटल कॉलेज आणि हॉस्पिटलअमरावती **Code No. BDS0009**	**BDS**	**3,57,000/-**
		BDSPG	**Rejected**

ब) सदर प्रकरणावर वेळेअभावी सविस्तर चर्चा करणे शक्य न झाल्यामुळे, खालीलप्रमाणे नमूद केलेल्या पुनर्विलोकन अर्जावरील निर्णय पुढील बैठकीपर्यंत स्थगित ठेवण्यात येत आहे;

Sr. No	Review application No.	Code	Name of the Institute	Course
1	104/2026.	BBA16253	Svpm'S College Of Commerce, Science And Computer Education, Malegaon (Bk.), Baramati, Pune	BBA
2	125/2026.	BBA02677	Shri Shivaji College, Parbhani	BBA BCA
3	135/2026.	BMS03572	South Indian Eduction Society'S College Of Commerce & Economics, Sion, Mumbai	BMS
4	137/2026.	BBA16334	Poona College Of Arts Science And Commerce, Pune	BBA BCA
5	142/2026.	BBA16237	Rajmata Jijau Shikshan Prasarak Mandals Arts Commerce And Science College Bhosari Pune	BBA BCA
6	144/2026.	BBA16254	Sir Parashurambhau College, Haveli, Pune	BBA
7	152/2026.	BBA16159	Brihan Maharashtra College Of Commerce, Pune	BBA BMS
8	154/2026.	BBA16202	MES Senior College, Kotharud, Pune	BBA
9	231/2026	BMS03574	SIES College Of Arts, Science And Commerce (Empowered Autonomous), Mumbai	BMS
10	83/2026.	AR6261	Maharshi Karve Stree Shikshan.Samstha'S ,Dr. Bhanuben Nanavati College Of Architecture For Women, Karvenagar, Pune	ARCH
11	219/2026	AR6818	Satish Misal Educational Foundation'S Brick School Of Architecture, Pune	ARCH

दिनांक: २३ ऑक्टोबर, २०२६
ठिकाण: मुंबई

(शेखर माधुरी मनोहर चन्ने, भा.प्र.से.(से.नि.सचिव)
अध्यक्ष,
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य